

# स्फूर्ती गीते



# वंदे मातरम्

वंदे मातरम् !

सुजलाम् सुफलाम् मलयजशीतलाम्
सश्यश्यामलाम् मातरम् । वंदे मातरम् ।।

शुभ्रज्योत्स्ना पुलकित यामिनिम्
फुल्लकुसुमित द्रुमदल शोभिनीम्
सुहासिनीम् सुमधुरभाषिणिम्
सुखदाम् वरदाम् मातरम् ।। वंदे मातरम् !

कोटि कोटि कण्ठ कलकल निनाद कराले,
कोटि कोटि भुजैर्धृत खरकरवाले,
अबला केन मा एकबले बहुबलधारिणिम्
नमामि तारिणिम् रिपुदलवारिणिम् । मातरम् !
वंदे मातरम् !!

तुमि विद्या, तुमि धर्म, तुमि ह्रदि, तुमि मर्म
त्वं हि प्राणाः शरीरे, बाहुते तुमि मा शक्ति,
ह्रदये तुमि मा भक्ति, तोमारई प्रतिमा गडि मंदिरे ।
मातरम् ! वंदे मातरम् !!

त्वं हि दुर्गा दशप्रहरणधारिणी ।
कमला कमलदल विहारिणी । वाणी विद्यादायिनी,
नमामि त्वां । नमामि कमलाम्, अमलाम्, अतुलाम्
सुजलाम्, सुफलाम् मातरम् ।। वंदे मातरम् !!

श्यामलाम्, सरलाम्, सुस्मिताम्, भूषिताम्
धरणीम् भरणीम् मातरम् । वंदे मातरम् !!

- बंकिमचंद्र

# स्फूर्ती गीते

सातम उद्योग™
www.satamudyogbooks.com

- ई-बुक आवृत्ती
- संकलन व संपादन : गुरुदास
- प्रकाशक : हेमंत स. साटम
- मुद्रक : साटम उद्योग
  २०३, अमित इंड. इस्टेट,
  लालबाग, मुंबई–४०० ०१२.
  ८१६९९ ८४९२७

# अनुक्रम :


१. बलसागर भारत होवो ..................... ६
२. नवा शिपाई .................................. ७
३. उचललेस तू मीठ मूठभर ................. ८
४. सदैव सैनिका ................................ ९
५. शूर आम्ही सरदार ......................... १०
६. आमचे निशाण ............................. ११
७. या रे या रे .................................. १२
८. ती पहा, ती पहा, बापुजींची प्राणज्योती ... १३
९. सैनिक हो तुमच्यासाठीं..................... १५
१०. जय जवान, जय किसान.................. १६
११. शिंग फुंकिले रणी .......................... १७
१२. अन्य नको वरदान .......................... १८
१३. अरे देवा, तुझीं मुलें ........................ १९
१४. जिंकू किंवा मरु ! .......................... २०
१५. खरा तो एकचि धर्म ....................... २१
१६. ये थोरवी श्रमासी........................... २२
१७. सर्वात्मका शिवसुंदरा ..................... २३
१८. ते अमर हुतात्मे झाले ..................... २४
१९. गाउं त्यांना आरती ......................... २५
२०. सैनिक माझे नाव ........................... २७
२१. मंगलदेशा, पवित्र देशा !.................. २८
२२. जय जय महाराष्ट्र माझा.................... २९
२३. दे वरचि असा दे ! ......................... ३०
२४. निर्धार ........................................ ३१
२५. वेद मंत्राहून आम्हा ........................ ३३
२६. मराठी पाउल पडतें पुढें .................... ३४
२७. दिशांत जाळ पेटले......................... ३६
२८. जात कोणती पुसूं नका .................... ३७
२९. गुरूनें दिला ज्ञानरूपी वसा ............... ३८
३०. अनाम वीरा ................................ ३९
३१. जय भारता, जय भारता !................ ४०

# दोन शब्द !

**चै**तन्याची परमावधी किंवा एखाद्या उत्कट भावनेचा परमोत्कर्ष म्हणजे स्फूर्ती. आणि स्फूर्ती देणारं काव्य किंवा गाणं म्हणजे स्फूर्ती गीत. स्फूर्ती गीतातील शब्द, आशय आणि लय यांना ओज असल्याने स्फूर्ती गीतं म्हणताना एखाद्या भावनेचं उदात्तीकरण होतं आणि ती सद्‌भावना उच्चतम शिखराला जाऊन पोहोचते.

जेव्हा एखाद्या गाण्याने अंत:करणातला भक्तीभाव दाटून येतो तेव्हा त्या गाण्यास भक्ती गीत म्हटलं जातं. पण जेव्हा एखादे गाणे म्हणताना किंवा ऐकताना देशप्रेमाचा भाव उंचबळून येतो. इतिहास घडविणाऱ्या वीर पुरुषांचं स्मरण होऊन त्यांच्या शौर्याच्या आठवणींनी देह रोमांचित होतो. बाहू स्फुरण पावतात, शत्रूबद्दल मनात क्रोधाग्नी पेटून उठतो, देशासाठी काही त्याग करण्याच्या ईर्षेने मन अधीर होऊन जातं, अशा कविता किंवा गीतांना स्फूर्ती गीतं म्हणून संबोधलं जातं. समूह गीते किंवा समर गीते असंही या गीतांना पर्यायी नाव आहे.

पूर्वीच्या काळात प्रत्यक्ष युद्धासाठी कूच करणारं सैन्य अशी स्फूर्ती गीत गात गात आणि अधून मधून त्वेषाने रणघोष करीत करीत शत्रूसैन्यावर तुटून पडत असत. म्हणूनच कदाचित अशा स्फूर्ती गीतांना ‘मार्चिंग सॉंग’ म्हटलं जात असावं. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेत अशी स्फूर्ती गीतं मोठ्या त्वेषाने म्हटली जात असत.

छत्रपती शिवरायांच्या सैन्यात ‘हर हर महादेव’ ही रणगर्जना करुन शत्रू सैन्यावर चढाई केली जात असे.

भारताला गुलाम करुन भारतीय प्रजेवर जुलमी सत्ता गाजविणाऱ्या ब्रिटिश सत्तेविरुद्ध आपण जो प्रदीर्घ लढा दिला त्या लढ्यात अशी अनेक स्फूर्ती गीतं लिहिली गेली. आणि ती वेगवेगळ्या आंदोलनांच्या काळात प्रभात फेऱ्या, मेळे, शाहिरांचे जाहीर कार्यक्रम यामधून अतिशय त्वेषाने म्हटली जात असत.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्या नंतरच्या काळात भारतीय जनता आणि भारतीय सैन्याला तीन युद्धांना सामोरं जावं लागलं. या युद्धकाळात जनतेचं नीतिधैर्य उंचावून ते प्रत्यक्ष युद्धभूमीवर युद्ध लढणाऱ्या सैन्याच्या पाठीशी पाठबळ म्हणून उभे करण्यासाठी अनेक प्रतिभावंत कवींनी असंख्य स्फूर्ती गीते लिहिली. या स्फूर्ती गीतांच्या सामूहिक गायनाने देशातील जनजीवनात जे चैतन्य निर्माण केलं होतं, त्याचं वर्णन करणं अशक्य.

स्वातंत्र्य लढ्याच्या काळात आणि त्यानंतरच्या युद्ध काळात अनेक प्रतिभावंत मराठी कवींनी अतिशय जोषपूर्ण काव्य रचना केल्या होत्या. आजही त्या लोकप्रिय आहेत. अशा काही निवडक स्फूर्ती गीतांचा समावेश या पुस्तिकेत करण्यात आला आहे. ही स्फूर्ती गीतं लहानथोरांना प्रेरणादायी ठरावी ही अपेक्षा.

**- गुरुदास**